मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शनिवार, दि. 9 ऑगस्ट 2025 | पान- 1

# पुणे जिल्ह्यात तीन नव्या महापालिका होणार

## उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवारांनी केली घोषणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज (8 ऑगस्ट) पहाटेच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या चाकण चौक आणि परिसराची पाहणी केली. पुणे-नाशिक आणि चाकण-शिक्रापूर मार्गावरील या चौकात वाहतूक कोंडी नित्याची असती. याचं चौकातून चाकण एमआयडीसीमध्ये कर्मचाऱ्यांना जावं लागतं. या एमआयडीसीमध्ये 1500 छोट्या-मोठ्या कंपन्या आहेत, त्यात साडे तीन लाख कर्मचारी काम करतात. त्यामुळं या परिसरात रोज लाखभर वाहनं ये-जा करतात. त्यामुळं या चौकातील कोंडी फोडण्याचं मोठं आव्हान सरकारसमोर असणार आहे. यावेळी चाकणला स्वतंत्र महानगरपालिका होणार असल्याचे सूतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. चाकणच्या वाहतूक कोंडीची पाहणी करताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे सोबतच बारामतीची तुलना चाकण सोबत करू नका असे अजित पवार यांनी म्हटलं आहे.

तुम्हाला आवडो किंवा न आवडो पण नजीकच्या काळात चाकण आणि या सर्व परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार आहे, आणि महानगरपालिका केल्याशिवाय आपल्याला अधिकचा निधी आणि बाकीच्या ज्या काही गोष्टी आहेत जसे की रस्ता अंडरग्राउंड ड्रेनेज, अशा अनेक बाबी असतात, यामध्ये बँकांचे वर्ल्ड बँकचे पैसे आणता येतात, केंद्र सरकारचा निधी आणता येतो, या प्रकारे आपल्याला करावे लागेल. काहींना ते आवडेल काहींना आवडणार नाही. मात्र, काळानुसार निर्णय घ्यावे लागतात. मी देखील काम करताना पाहिले आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये नव्या महापालिका आल्या, ठाणे महानगरपालिका एकटी होती, त्यानंतर मुंबई महानगरपालिका झाली. मीरा भाईंदर महानगरपालिका झाली, जिल्ह्यामध्ये उल्हासनगर महानगरपालिका झाली, तिथे पूर्वीपेक्षा आता वेगाचा विकास झाला आहे, वसई विरार महानगरपालिका झाली, त्या ठिकाणी सहा सात महानगरपालिका



झाल्या. तसं आपल्या जिल्ह्यात पुणे, पिंपरी चिंचवड त्यानंतर वाकवस्ती, लोणी काळभोर, वाघोली, मांजरी या सर्व भागांमध्ये एक महानगरपालिका करावी लागेल, फुरसुंगी, उरुळी देवाची, तो सर्व परिसर एक महानगरपालिका नदी ओलांडून इकडे आलो पिंपरी चिंचवड मधनं तर बाकीच्या भागांमध्ये एक महानगरपालिका करावी लागेल आणि एक महानगरपालिका आपल्याला हिंजवडी आणि जो सर्व वरचा परिसर आहे त्या भागामध्ये करावी लागेल. साधारण महानगरपालिका करण्याच्या करता पाच लाख लोकसंख्या असली की महानगरपालिका करता येते, तुम्हाला सगळ्यांनाही माहिती आहे. या सगळ्या भागातील लोकसंख्या किती आहे. चाकणचा प्लॅन देखील आलेला आहे. मी म्हटलं तुम्ही मंजुरी घ्या, मी एकनाथ शिंदे यांची मदत घेतो, असेही पुढे अजित पवार यांनी म्हटला आहे

पुणे जिल्ह्यात नव्यानं तीन महापालिका कराव्या लागणार

चाकण आणि परिसरात महानगरपालिका करावी लागणार आहे, अशी घोषणा अजित पवारांनी यावेळी केली. आज मी चाकणची वाहतूक कोंडी फोडण्याच्या दृष्टीने दौरा केला. सकाळी 5:45 वाजता मी आलो. नॅशनल हायवे, पीएमआरडीए, जिल्हाधिकारी, पालिकेचे आयुक्त या सर्वांना मी योग्य त्या सूचना दिल्या आहेत. तळेगाव ते शिक्रापूर हा मार्ग सहा पदरी करणार आहे, त्यासाठी निधी ही देतोय. त्यानंतर पुणे-नाशिक हा एलीवेटेड मार्ग करुयात. हे केल्याशिवाय गत्यंतर नाही. तुम्ही खूप त्रास सहन केलाय, तुम्ही सहनशीलता दाखवली. पण आता यातून सुटका करुयात. चाकण आणि परिसरात महानगरपालिका करावी लागणार आहे. काहींना आवडेल न आवडेल, पण हे करावं लागेल, असंही अजित पवारांनी यावेळी म्हटलं आहे.

पुणे जिल्ह्यात नव्यानं तीन महापालिका कराव्या लागणार असल्याचं वक्तव्य अजित पवारांनी केलं आहे, मांजरी, फुरसुंगी, उरळी देवाची या भागात एक महापालिका आणि चाकण भागात एक आणि हिंजवडी भागात एक महापालिका करावी लागणार आहे, असंही अजित पवारांनी यावेळी बोलताना म्हटलं आहे.

### पोलीस आयुक्तांना अजितदादांनी खडसावलं

**» मी सकाळी 6 वाजता दौरा करतोय, एक गाडी थांबली की गाड्यांच्या रांगा लागतायेत. मग पिक टाईममध्ये काय अवस्था होत असेल, असं अजित पवार म्हणाले. तसेच अजित पावर पाहणी करत असताना चाकणच्या चौकात पिंपरी चिंचवड पोलिसांनी वाहनं रोखून धरली. त्यामुळं अजित पवारांनी पोलीस आयुक्त विनायकुमार चौबेंना खडसावले. ओ चौबे, हे बरोबर नाही. मूर्खांसारखं ही वाहनं थांबवून कोंडी का केली आहे?, सगळी वाहतूक सुरु करा, असं अजित पवार म्हणाले आहेत. तसेच चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतुककोंडीचा आढावा घेताना अजित पवारांनी आधिकाऱ्यांना रस्त्यांवरील खड्ड्यांचे फोटोही दाखवले.**


# बिबट्याच्या दहशतीखाली चऱ्होलीकर; लहान मुलांना शाळेत पाठविणे बंद

## मागील काही दिवसांपूर्वी चऱ्होली परिसरात बिबट्याचा वावर; चऱ्होलीकरांना कळले, अन् धडकी भरली

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपूर्वी चऱ्होली परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे चऱ्होलीकरांना कळले, अन् धडकी भरली. त्यानंतर लहान मुलांना शाळेत पाठविणे नागरिकांनी बंद केले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी परिसरात पाहणी केल्यानंतर बिबट्याच्या पायाचे ठसे दिसून आले आहेत. मात्र, ट्रॅप कॅमेऱ्यांत अजून त्याची कोणतीही हालचाल चित्रित झालेली नाही.त्यामुळे बिबट्या एक आहे किंवा अधिक याबद्दल अद्याप वन विभागाला ठोस काही समजू शकलेले नाही. परंतु, खबरदारी म्हणून वन विभागाने गस्त सुरू केली असून, काही ठिकाणी पिंजरे लावण्याचीही तयारी सुरू केली आहे.

चऱ्होली परिसरातील नागरिक बिबट्याच्या वावरामुळे दहशतीखाली आहेत. मागील काही दिवसांपासून चऱ्होली परिसरातील अनेक वस्ती आणि शेतजमिनींमध्ये बिबट्याचे वारंवार दर्शन झाल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बुर्डे वस्ती, मुक्ताई कार्यालय, काळे



पेट्रोल पंप परिसर, काटे वस्ती व दाभाडे वस्ती येथे बिबट्याचे दर्शन झाल्याचे नागरिकांचे सांगितले आहे.

चऱ्होलीत वन विभागाची गस्त दाभाडे वस्ती व काटे वस्ती येथे होती. शेतामध्ये गुरुवारी (ता.६) आवळ्याच्या झाडावर बिबट्या बसलेला आढळून आला. काही स्थानिकांनी या घटनेचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केले आहे.

बिबट्याच्या दहशतीने चऱ्होलीतील मुलांचे शैक्षणिक नुकसान

मुलांच्या सुरक्षिततेची चिंता पालकांमध्ये प्रंचड वाढली आहे. अनेक पालकांनी आपल्या मुलांना शाळेत पाठविणे थांबविले आहे.तर काहीजण सकाळ व सायंकाळच्या वेळेस मुले रस्त्याने एकटी जाणार नाहीत, यासाठी घरातील मोठ्या व्यक्तींना त्यांच्यासोबत पाठविण्याची खबरदारी घेत आहेत. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती घटली असून त्याने शिक्षक आणि शाळा प्रशासनही चिंतेत आहेत. बिबट्याच्या दहशतीमुळे चऱ्होलीतील मुलांचे शैक्षणिक नुकसान होते आहे.

**नागरिकांच्या मागण्या...**

बिबट्याचा वावर असणाऱ्या ठिकाणी

दिवस-रात्र गस्त वाढवा

बिबट्याला पकडण्यासाठी जास्त सापळे लावावेत

ट्रॅप कॅमेरे बसवावेत

वनविभागाने तात्पुरती पथके नेमावीत

स्थानिक प्रशासनाचे आवाहन

नागरिकांनी रात्री घराबाहेर पडू नये,

शक्यतो एकट्याने प्रवास

# ओ चौबे, हे बरोबर नाही, मूर्खासारखं...

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पोलीस आयुक्तांना झापलं, नेमकं काय घडलं?

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज (8 ऑगस्ट) पहाटेच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या चाकण चौकात पाहणी केली. पुणे-नाशिक आणि चाकण-शिक्रापूर मार्गावरील या चौकात वाहतूक कोंडी नित्याची असती. याचं चौकातून चाकण एमआयडीसीमध्ये कर्मचाऱ्यांना जावं लागतं. या एमआयडीसीमध्ये 1500 छोट्या-मोठ्या कंपन्या आहेत, त्यात साडे तीन लाख कर्मचारी काम करतात. त्यामुळं या परिसरात रोज लाखभर वाहनं ये-जा करतात. यातील चाकण-शिक्रापूर मार्गावरून अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजी नगर येणारी अवजड वाहतूक जेएनपीटीकडे जाते. त्यामुळं या चौकातील कोंडी फोडण्याचं मोठं आव्हान सरकारसमोर असणार आहे.



पोलीस आयुक्त चौबेंना अजित दादांनी खडसावले-

मी सकाळी 6 वाजता दौरा करतोय, एक गाडी थांबली की गाड्यांच्या रांगा लागतायेत. मग पिक टाईममध्ये काय अवस्था होत असेल, असं अजित पवार म्हणाले. तसेच अजित पावर पाहणी करत असताना चाकणच्या चौकात पिंपरी चिंचवड पोलिसांनी वाहनं रोखून धरली. त्यामुळं अजित पवारांनी पोलीस आयुक्त विनायकुमार चौबेंना खडसावले. ओ चौबे, हे बरोबर नाही. मूर्खासारखं ही वाहनं थांबवून कोंडी का केलीय?, सगळी वाहतूक सुरु करा, असं अजित पवार म्हणाले. तसेच चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतुककोंडीचा आढावा घेताना अजित पवारांनी आधिकाऱ्यांना रस्त्यांवरील खड्डयांचे फोटोही दाखवले.

### पीएमआरडीए कार्यालयात बैठक

» आयटी पार्क हिंजवडीनंतर चाकणची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अजित पवार सकाळी दौरा करत आहेत. सकाळी सहा वाजता पुणे-नाशिक महामार्गावरील मोशी येथून या दौऱ्याची सुरुवात झाली. इथून चाकण आणि चाकण एमआयडीसी दरम्यान ज्या-ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते, तेथील पाहणी करत, ते नऊ वाजता आकुर्डीतील पीएमआरडीए कार्यालयात अजित पवार बैठक घेणार आहेत.

# मोशीतील शिवशंभो प्रतिष्ठाणला व्दितीय पारितोषिक

## विशाल मित्र मंडळाला प्रथम क्रमांक तर आझाद हिंद मंडळाला तृतीय क्रमांक



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय आयोजित मोरया पुरस्कार सोहळा २०२५ चे व्दितीय पारितोषिक मोशीतील बारणेवस्तीमधील शिवशंभो प्रतिष्ठाणला मिळाले आहे.

या पुरस्कार सोहळ्यामध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व सहभागी गणेश मंडळांमधून निकषाच्या आधारे पोलीस आयुक्त स्तरावर तीन मंडळांना पुरस्कार देण्यात आला. यात थेरगाव येथील विशाल मित्र मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला. बारणे वस्ती मोशी येथील श्री शिवशंभो प्रतिष्ठानला द्वितीय तर फुगेवाडी येथील आझाद हिंद मंडळाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

मोशी बारणेवस्ती मधील शिवशंभो प्रतिष्ठाणच्या वतीने दरवर्षी शांतता अन् एकात्मकतेचा संदेश दिला जातो. दरवर्षी मंदीर, राजवाडा अशा भव्य-दिव्य अशा सुशोभित प्रतिकृतींचा देखावा साकारला जातो.

“ लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सवातून लोकांना एकत्र आणून एकात्मकतेचा संदेश दिला. शांतता अन् एकात्मकता जपण्याचे काम शिवशंभो प्रतिष्ठाण करते आहे. दरवर्षी आगमन अन् विसर्जनाला डिजे चा वापर न करता पारंपारिक वाद्यवृदांचा वापर केला जातो. दहा दिवस धार्मिक उपक्रम अन् भजन असते.

**- संतोष बारणे, शिवशंभो प्रतिष्ठाण अध्यक्ष.**

(पान १ वरून)

टाळावा

बिबट्या दिसल्यास तातडीने १९२६ किंवा वन विभागाच्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा

### दहशतीने चऱ्होलीतील मुलांचे शैक्षणिक नुकसान

» मुलांच्या सुरक्षिततेची चिंता पालकांमध्ये प्रंचड वाढली आहे. अनेक पालकांनी आपल्या मुलांना शाळेत पाठविणे थांबविले आहे. तर काहीजण सकाळ व सायंकाळच्या वेळेस मुले रस्त्याने एकटी जाणार नाहीत, यासाठी घरातील मोठ्या व्यक्तींना त्यांच्यासोबत पाठविण्याची खबरदारी घेत आहेत. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती घटली असून त्याने शिक्षक आणि शाळा प्रशासनही चिंतेत आहेत. बिबट्याच्या दहशतीमुळे चऱ्होलीतील मुलांचे शैक्षणिक नुकसान होते आहे.

“ चऱ्होली परिसरामध्ये बिबट्या असल्याचे चित्रीकरणही नागरिकांनी केले आहे. बिबट्या ही (मादी) असून तिच्यासोबत दोन पिल्लांचा वावर असल्याचे समजते आहे. त्या पिल्लांना धोका जाणवला तर बिबट्या मादी आक्रमक होऊन हल्ला करू शकते. तिची पिल्ले छोटी असल्याने उचलून नेता येत नसल्याचे सांगण्यात येते. मात्र बिबट्या भरवस्तीमध्ये फिरताना दिसत आहे. मुले शाळेत जाताना एकटी असतील, तर त्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने त्वरित पावले उचलली पाहिजेत.

**- सचिन तापकीर, सामाजिक कार्यकर्ते.**

“ आम्ही घटनास्थळी जाऊन सर्व परिसराची पाहणी केली. एका शेतात जमिनीत बिबट्याचे ताजे ठसे स्पष्टपणे दिसून आले. त्यावरून अंदाज येतो की बिबट्या नुकताच त्या भागातून गेला आहे. त्यामुळे नागरिकांनी अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. झाडांची दाटी आणि शेतामधील काटेरी झुडपे यामुळे बिबट्याला लपण्यासाठी पोषक वातावरण मिळत आहे. त्यामुळे आम्ही त्या भागात गस्त वाढवली असून लवकरच पिंजरे लावले जातील. वरीष्ठांच्या आदेशानुसार नागरिकांना जागृत करण्याचे काम सुरु आहे.

**- अशोक गायकवाड, वनरक्षक लोहगाव, परिक्षेत्र पुणे.**

# खान्देश बांधवांच्या 'आई कानबाई' उत्सवात भाविकांचा महापूर

## कानबाई माता नाही कोणा एकाची आहे समस्त खान्देशाची, या भावनेची सर्वत्र प्रचिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील चिंचवडेनगर येथील चिंतामणी चौकातील पीएमआरडीए ग्राउंड येथे समस्त खान्देश बांधव कानबाई माता उत्सव समिती आणि श्री कानबाई माता चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'आई कानबाई माता सार्वजनिक उत्सव २०२५' उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. उत्सवात कोणताही राजकीय गट किंवा नेत्याचे वर्चस्व न राहता, सर्व पक्ष व सर्व विचारधारांचे लोक एकत्र आले होते. यामुळे कार्यक्रमात सामंजस्य, सहकार्य आणि सौहार्दाचे वातावरण होते. “कानबाई माता नाही कोणा एकाची आहे समस्त खान्देशाची” ही भावना कार्यक्रमभर दिसून आली.



तीन दिवस चाललेल्या या उत्सवात पारंपरिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गहू दळणे, सप्तपूजन, कीर्तन, भजन, आणि मिरवणूक यांसारखे विविध कार्यक्रमांचे नियोजन सुरळीत करण्यात आले. पहिल्या दिवशी ह.भ.प. रविकिरण महाराज दोंडाईचेकर यांच्या कीर्तनासाठी सुमारे पाच हजार भाविक उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी, कानबाई मातेच्या स्थापनेच्या दिवशी, भक्तांची संख्या वाढून बारा हजारांवर पोहोचली. तिसऱ्या दिवशी, विसर्जन मिरवणुकीस मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले. रात्री आठ वाजता गायक आबा चौधरी, धीरज चौधरी आणि शीरपुरकर यांची देवीची भक्तीमय गीते आणि अहिराणी भाषेतील गीते एकूण भाविक भक्तिरसात तल्लीन झाले होते. 'स्वरगंगा बँड' नेही कार्यक्रमात रंगत आणली होती. देवीची मिरवणूकही शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

उत्सवाला अनेक मान्यवरांनी भेट दिली. यामध्ये खासदार श्रीरंग आप्पा बारणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार शंकर जगताप, आमदार अनिल दादा पाटील, आमदार कुणाल पाटील, पिंपरी-चिंचवडच्या माजी महापौर माई ढोरे, तसेच माजी जेष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, नाना काटे, राहुल कलाटे, प्रशांत शितोळे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी नगरसेविका , संगीताताई भोंडवे, करुणा चिंचवडे, शारदा सोनवणे, चिंचवड विधानसभेचे शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर, माधव पाटील, राजेंद्र चिंचवडे, राजेंद्र साळुंखे, माऊली सूर्यवंशी यांनीही उत्सवात उपस्थिती लावली. उत्सवाच्या आयोजनामध्ये समस्त खान्देश बांधव उत्सव समिती आणि श्री कानबाई माता चॅरिटेबल ट्रस्ट यांनी प्रमुख भूमिका बजावली. नियोजन, सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन, प्रसाद व्यवस्था, आरोग्य सुविधा याकडे विशेष लक्ष देण्यात आले होते.

खासदार श्रीरंग आप्पा बारणे म्हणाले, “असा उत्सव मी याआधी पाहिलेला नाही. एकमेकांवर कोणतीही टीका किंवा वर्चस्व न ठेवता, सर्व लोकांनी मिळून एकोप्याने सहभाग घेतला. यामुळे ही परंपरा जपली गेली आहे. अशा प्रकारचे आयोजन इतर भागातही व्हावे अशी अपेक्षा आहे.”

त्याचप्रमाणे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी देखील उपस्थित राहून उत्सवाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, “हा उत्सव केवळ धार्मिकता नाही, तर सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचे प्रतीक आहे. याच धर्तीवर धार्मिक कार्य्कार्माच्या माध्यमातून समाजात सकारात्मक संदेश दिला जावा.”

### 'सामाजिक ऐक्य, श्रद्धा आणि समन्वयाचं प्रतीक'

**» आई कानबाई उत्सव हा फक्त एक धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर तो एक सामाजिक ऐक्याचा, श्रद्धेचा आणि समन्वयाचा प्रतीक बनला. कोणतीही अडचण न येता, कोणताही गाजावाजा न करता, शांततेत, भक्तिभावात आणि सामाजिक सलोख्यात साजरा झालेला हा उत्सव अनेकांसाठी प्रेरणादायक ठरला. उत्सवामध्ये एक विशेष बाब म्हणजे कुठल्याही कार्यकर्त्याने वैयक्तिक श्रेय घेण्याचा प्रयत्न केला नाही. सर्वांनी सामूहिक प्रयत्नातून कार्यक्रम पार पाडला. कोणताही फोटो, बॅनर, जाहिरात किंवा घोषणाबाजी न करता कार्यक्रम पार पाडण्यात आला. यामुळे उपस्थित भाविकांमध्ये समाधान आणि श्रद्धेची भावना दिसून आली.**

---

# विकास आराखड्यावरून प्रा. कविता आल्हाट आक्रमक

## प्रशासनाने सर्व सामान्यांना विचारात न घेता विकास आराखडा



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका प्रशासनाने सर्व सामान्यांना विचारात न घेता विकास आराखडा आखला आहे. शेतकऱ्यांना, भूमीपुत्रांना विचारात न घेता, पदाधिकाऱ्यांना हाताशी धरून केला असून, सर्वसामान्य, शेतकरी, भूमीपुत्रांना सोबत घेऊन आराखडा करायला पाहिजे होता. चुकीच्या पध्दतीने झालेल्या विकास आराखड्याला विरोध करण्यासाठीच जनआक्रोश मोर्चा काढला आहे.

सर्वसामान्यांच्या घरावरून रस्त्याचे आरक्षण, कत्तलखाना, टीपी, डीपी चे चुकीचे आऱक्षण टाकले आहेत. अधिकाऱ्यांनी खूर्चीवर बसून हा आराखडा आखला आहे. त्यांना जागेवरची परिस्थीती माहिती नाही. शेतकरी, सर्वसामान्य नागरिक यांना विश्वासात घेऊन आऱाखडा होणे अपेक्षित होते. चुकीच्या आराखड्यावरून प्रशासनाचा आम्ही निषेध करत आहोत असे अनेक महिलांसह शहराध्यक्षांनी केला आहे.

> “ मोशी परिसरातून सुमारे पाचशे महिलांनी आंदोलनामध्ये सहभाग नोंदविला होता. विकास आराखड्याचा त्रास चिखली-मोशी-चऱ्होलीकरांनाही झाला आहे. अनेक चुकीच्या आरक्षणांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. याचे रूद्ररूप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे आयोजित जनआक्रोश आंदोलनामध्ये पहायला मिळाले.
>
> **- प्रा. कविता आल्हाट, शहराध्यक्षा.**

---

# कॅम्पमध्ये पोलीसगस्त वाढवा, व्यापाऱ्यांना संरक्षण द्या

## पिंपरी मर्चंट फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवानी यांची मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी कॅम्प परिसरात पूर्वी प्रमाणे २४ तास पोलीस तैनात करावे, तसेच पूर्वी बाजारपेठे मध्ये दुचाकीवरील मार्शल राऊंड मारून पोलीस पहारा देत होते, ते पुन्हा सुरू करावे. पिंपरी मंडई जवळ पोलीस चौकी आहे. तेथे असणारा लँडलाईन फोन मागील पाच वर्षांपासून बंद आहे, तो ताबडतोब सुरू करावा.

एखादी दुर्घटना, चोरी, मारामारी, पाकीटमारी, अपघात अशा घटना घडल्या की संपर्क करणे सोपे होते. यापूर्वी या पोलीस चौकीमध्ये देखील तक्रार नोंद करून घेतली जात होती ते आता होत नाही. बाजारपेठेपासून पिंपरी पोलीस स्टेशन हे पुणे मुंबई महामार्गावर ४ ते ५ किलोमीटर लांब आहे.

तेथे तक्रार नोंद करायला गेलो की तेथील ठाणे अंमलदार नोंद करून घेण्याऐवजी तक्रार करण्यास केलेल्या व्यापाऱ्यांना अनेक प्रश्न विचारून हैराण करतात. पथारी टाकून बसलेल्यांना हटवण्या ऐवजी त्यांनाच संरक्षण देऊन पोलीस दुकानदार, व्यापाऱ्यांना त्रास देतात.

मागील आठवड्यात पिंपरी कॅम्पातील व्यापाऱ्यावर झालेल्या गोळीबार घटनेतील आरोपीला कडक शिक्षा द्यावी अशा मागण्या करीत पिंपरी कॅम्प मधील व्यापाऱ्यांनी गुरुवारी (दि. ७) बाजारपेठ बंद ठेऊन पोलिसांचा निषेध केला. अशा मागणीचे पत्र पिंपरी मर्चंट फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवानी यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

# विसर्जन मिरवणुकीबाबत चर्चेने तोडगा काढू

## विसर्जन मिरवणुकीबाबत समन्वयाने तोडगा काढण्यासाठी सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची लवकरच एकत्रित बैठक घेण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

वैभवशाली परंपरा असलेल्या गणेशोत्सवातील विसर्जन मिरवणुकीत लवकर सहभागी होण्यावरून निर्माण झालेला प्रश्न सर्वसंमतीने सोडवू. मानाचे गणपती किंवा अन्य मंडळांमध्ये अजिबात मतभेद नाहीत. विसर्जन मिरवणुकीबाबत समन्वयाने तोडगा काढण्यासाठी सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची लवकरच एकत्रित बैठक घेण्यात येणार आहे. त्यानंतर याबाबतचा निर्णय जाहीर केला जाईल, असा निर्णय मानाच्या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर केला

दरम्यान, यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळाचे पदाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक पार पाडली. या वेळी पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील, राजेश बनसोडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या बैठकीस उपस्थित होते. श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, श्री तांबडी जोगेश्वरी मंडळाचे प्रसाद कुलकर्णी, श्री गुरुजी तालीम मंडळाचे प्रवीणसिंह परदेशी, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे नितीन पंडित, विकास पवार, केसरी गणेशोत्सव ट्रस्टचे अनिल सपकाळ, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशोत्सव ट्रस्टचे सुनील रासने, महेश सूर्यवंशी, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणेशोत्सव ट्रस्टचे उत्सव प्रमुख पुनित बालन, हुतात्मा बाबू गेन मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे, तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते आणि प्रमुख मंडळांचे पदाधिकारी श्रीकांत शिरोळे, अंकुश काकडे, रवींद्र माळवदकर, संजय बालगुडे, श्रीकांत मिसे, पुष्कर तुळजापूरकर, सुनील कुंजीर, विशाल गुंड, आनंद सगरे या वेळी उपस्थित होते.



### मानाच्या मंडळांपाठोपाठ आम्ही...

» मानाच्या गणपती मंडळांची विसर्जन मिरवणूक बेलबाग चौकातून मार्गस्थ झाल्यानंतर त्यापाठोपाठ श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती आणि अखिल मंडई मंडळाचा गणपती मिरवणुकीला मार्गस्थ होईल, असे अण्णा थोरात आणि पुनित बालन यांनी स्पष्ट केले. पुनित बालन म्हणाले, येत्या दोन ते तीन दिवसांत सर्व मंडळे एकत्रित बैठक घेतील आणि चर्चेतून मार्ग निघेल. मात्र, हे निश्चित आहे की, मानाच्या पाचव्या गणपतीपाठोपाठ श्रीमंत भाऊसाहेब रंगारी आणि अखिल मंडई मंडळ मिरवणुकीत सहभागी होईल. आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत. यासाठी सर्व मंडळांशी चर्चा करून मार्ग काढू. दरम्यान, श्रीमंत भाऊ रंगारी मंडळाकडून यंदा विसर्जन मिरवणुकीत ढोल पथकांची संख्या तीन ऐवजी दोनच असेल, असे पुनित बालन यांनी स्पष्ट केले.

### एकच पथकाचा नियम लागू करावा

» पहिल्या बैठकीत विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आक्षेप नोंदविला. मानाच्या पाच मंडळांना आणि अन्य मंडळांना पोलिसांकडून वेगळा न्याय दिला जातो. वेळेत मिरवणूक आटोपण्यासाठी पोलिसांनी मिरवणुकीमध्ये 'एक मंडळ एक ढोल पथक' हा नियम लागू करावा. मानाच्या मंडळांसाठी पोलिसांनी केळकर, कुमठेकर, तसेच टिळक रस्त्यावरील मंडळांची अडवणूक करू नये. विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ सकाळी सात वाजता करण्यास परवानगी द्यावी, तसेच लक्ष्मी रस्त्यावर आणखी मंडळांना परवानगी देऊ नये, गणेशोत्सवात बेलबाग चौक ते नाना पेठ हा रस्ता बंद न करता सुरू ठेवावा, अशी मागणी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी या बैठकीत केली.

" मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या दोन बैठका झाल्या. बैठकीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्या. मिरवणुकीतील क्रमांकाबाबत पोलिस स्वतःहून कोणताही निर्णय घेणार नाहीत. जी परंपरा, प्रथा आहे, ती अबाधित राहावी. पोलिसांच्या दृष्टीने सर्व मंडळे सारखीच आहेत. त्यामुळे सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन विसर्जन मिरवणुकीबाबत निर्णय घ्यावा. त्यानंतर पोलिसांकडून पुन्हा एकत्रित बैठकीचे आयोजन केले जाणार आहे.

- अमितेश कुमार, पोलिस आयुक्त, पुणे

# 'आरटीओ'कडे रिक्षाचालकांविरोधात 252 तक्रारी

## भाडे नाकारणे, उद्धट वर्तन, अतिरिक्त भाडे, रिक्षा मीटर फास्टच्या कारणावरून तीन महिन्यांत 175 जणांना नोटीस

**पुणे | प्रतिनिधी**

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) गेल्या तीन महिन्यांत तब्बल 252 रिक्षाचालकांविरोधात आलेल्या तक्रारींमुळे कडक कारवाई करायला सुरुवात केली आहे. भाडे नाकारणाऱ्या आणि प्रवाशांशी उद्धट वर्तन करणाऱ्यांना त्यामुळे चांगलीच चपराक बसली आहे. (

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने बजाविलेल्या नोटिसांमुळे आणि केलेल्या दंडामुळे रिक्षाचालक-मालकांच्या वर्तुळात घबराट पसरली असून, याबाबत आरटीओने सौम्य भूमिका घ्यावी, अशी मागणी रिक्षा संघटनांनी केली आहे. त्याचप्रमाणे सर्व रिक्षा व्यावसायिकांनी प्रवाशांना नियमानुसार उत्तम सेवा पुरवावी, असे आवाहनही केले आहे.

एप्रिल ते जून 2025 या कालावधीत आरटीओला 252 तक्रारी आल्या होत्या. त्यापैकी 175 रिक्षाचालकांना नोटिसा पाठविल्या आहेत. इतर तक्रारींवर लवकरच कारवाई केली जाणार आहे, असे आरटीओकडून सांगण्यात आले आहे.

पुण्यातील रिक्षाचालकांना पांढरा शर्ट आणि खाकी पँट, असा गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. कोणत्याही अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि



ओळख पटविण्यासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 नुसार हा नियम लागू आहे. अनेक रिक्षाचालक या नियमाचे पालन करीत नसल्याचेही आरटीओच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे रिक्षाचालकांनी गणवेश परिधान करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तक्रारीसाठी व्हॉट्सअॅप क्रमांक

» पुणे आरटीओने मनमानी करणाऱ्या रिक्षाचालकांची तक्रार करण्यासाठी 8275330101 हा व्हॉट्सअॅप क्रमांक सुरू केला आहे. या क्रमांकावर प्रवाशांनी आपले नाव, मोबाईल नंबर, प्रवास मार्ग, रिक्षा नंबर, रिक्षाचा फोटो आणि मीटर भाड्याचा फोटो पाठवून तक्रार दाखल करावी.

### अक्र. - प्रकार - तक्रारींची संख्या

- » भाडे नाकारणे - 102
- » उद्धट वर्तन - 55
- » अतिरिक्त भाडे आकारणी - 65
- » फास्ट मीटर - 30
- » एकूण तक्रारी - 252